# जागतिक लोकसंख्या दिवस कार्यक्रम

महाविद्यालयात आज दि. ११/७/२०२६ रोजी जागतिक लोकसंख्या दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्त अर्थशास्त्र विभाग व आयक्यूएसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **भारतातील लोकसंख्या आणि आव्हाने** या विषयावर गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आले. यासाठी जयक्रांती महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. अविनाश पवार हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे हे होते. व्यासपीठावर आयक्युएसी प्रमुख प्रा.डॉ.शाहुराज मुळे यांची उपस्थिती होती.














सामना

## जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यान

लातूर, दि.१२(प्रतिनिधी)– कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे हे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून जय क्रांती महाविद्यालय येथील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.अविनाश पवार उपस्थित होते.अविनाश पवार यांनी आपल्या मार्गदर्शनात भारतातील वाढती लोकसंख्या, लोकसंख्येची रचना, युवा वर्गाचे प्रमाण, लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणारी आव्हाने आणि त्याचबरोबर उपलब्ध होणाऱ्या संधी यांचे सविस्तर विश्लेषण केले. कार्यक्रमास मीनाक्षी कोंगे, प्रा.शितल खोत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन प्राध्यापक संतोष कल्याणकर यांनी केले. प्रा. अंकिता वाडकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

Marathwada Edition
Jul 13, 2026 Page No. 7
Powered by: erelego.com

पुरोगामी विचाराचे
एकमत



# लोकसंख्येचे गुणवत्तापूर्ण मानवी भांडवलात रुपांतर करण्याची आवश्यकता

## डॉ. अविनाश पवार यांचे प्रतिपादन

## कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्याख्यान

**लातूर : प्रतिनिधी**

लोकसंख्या नियंत्रणाबरोबरच लोकसंख्येचे गुणवत्तापूर्ण मानवी भांडवलात रूपांतर करण्याची आवश्यकता आहे. तसेच शिक्षण, आरोग्य, स्त्री सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मिती यांवर भर दिल्यास भारत जगातील सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनू शकतो, असे प्रतिपादन लातूर येथील जयक्रांती महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अविनाश पवार यांनी केले.




दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त आयोजित अतिथी व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे हे होते.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी लोकसंख्या ही केवळ आकड्यांची बाब नसून ती विकासाचे प्रभावी साधन आहे. देशाच्या प्रगतीसाठी युवा शक्तीला योग्य दिशा देणे, कौशल्याधारित शिक्षणावर भर देणे आणि संसाधनांचा सुयोग्य वापर करणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी लोकसंख्या, पर्यावरण आणि विकास यांच्यातील परस्परसंबंध समजून घेऊन सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास डॉ. मीनाक्षी कोंगे, प्रा. शितल खोत यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शाहूराज मुळे यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक संतोष कल्याणकर यांनी केले. शेवटी प्रा. अंकिता वाडकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी देशमुख, नितीन पाटील यांनी परिश्रम घेतले.

प्रा. डॉ. शाहुराज मुळे
अर्थशास्त्र विभागप्रमुख
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगांव ता.जि.लातूर